# नगर परिषद कार्यालय मोर्शी
# ई-निविदा सुचना

क्रमांक/नपामो/जाक्र/आवि/निविदा सुचना /कावि- ११४५ /२०१७ दिनांक २१/०६ /२०१७

याव्दारे कळविण्यात येते की, नगर परिषद मोर्शी कार्यालयास सन २०१७-१८ या आर्थीक वर्षाकरीता आरोग्य विभाग मार्फत खालील प्रमाणे नोदंणीकृत कंत्राटदाराकडुन २०१७ ते दि. ३१/३/२०१८ या कालावधिकरीता कामे करावयाची आहे. मुख्याधिकारी नगर परिषद मोर्शी यांचे वतीने ई - निविदा पद्धतीने दर मागविण्यात येत आहे. निविदा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाचे http://www.mahatendars.gov.in या वेबसाईडवर दि. २४/६/२०१७ पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | अंदाजित किमंत ( वार्षीक ) | टेंडर फार्म | बयाना रक्कम | कामाचा कालावधि |
|---|---|---|---|---|---|
| १ | मोर्शी शहरातील सार्वजनिक नालीतील गाळ मजुराव्दारे काढणे व त्याची वाहतुक करण्यासाठी मजुर पुरविणे व इतर संलग्न बाबी | ३७,०८,८०० | ३०००/- | ५०,०००/- | ३१-३-२०१८ |
| २ | मोर्शी शहरातील घंटागाडीव्दारे घरोघरी जावून कचरा गोळा करणे व न.प.वाहनासाठी वाहन चालक पुरविणे व इतर संलग्न बाबी | ४३,०२,५४२ | ३०००/- | ५०,०००/- | ३१-३-२०१८ |

## ई निविदा प्रसिद्धीचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड प्रारंभ | दिनांक २४/०६/२०१७ ला दुपारी ११.०० वाजता |
| २ | ई-निविदा दस्ताऐवज डाऊनलोड समाप्त ( Emd ) | दिनांक १५/०७/२०१७ ला दुपारी ३ .००वाजेपर्यत |
| ३ | ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दिनांक २४/०६/२०१७ ला दुपारी ११.०० पासुन |
| ४ | ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक १५/०७/२०१७ ला दुपारी ५.०० वाजेपर्यंत |
| ५ | ई-निविदा उघडण्याची दिनांक ( Technical ) | दिनांक १७/०७/२०१७ ला स. ११ .०० वा. शक्य झाल्यास. |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ Mail व SMS व्दारे कळविण्यात येईल. | | |

निविदेच्या अटी व शर्ती

१. निविदा फॉर्म फी व ईसारा रक्कम online receipt system व्दारे भरणा करावी.
२. निविदाचा अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाचे http://www.mahatendars.gov.in या वेबसाईडवर सविस्तर पाहावयास मिळेल.
३. निविदा धारकांनी त्यांच्या नोंदणी संबधिच्या सर्व कागद पत्रे ऑनलाईन भरणा करावी लागेल. या निविदा संबधिचे दस्ताऐवज स्कॅन केलेल्या स्वरुपात विहित मुदतीत ई-निविदा सोबत सादर करणे बंधनकारक आहे.
४. या निविदेची सर्व कार्यवाही व शुद्धीपत्रके महाराष्ट्र शासनाचे http://www.mahatendars.gov.in या वेबसाईडवर उपलब्ध राहील.
५. निविदा स्विकारणे अथवा कोणतेही किंवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी न.प.मोर्शी यांचे कडे राखुन ठेवलेले आहे.
६. कंत्राटदाराने आयकर विवरणपत्र व पॅन कार्ड सादर करावे.
७. नागरी घनकचरा व्यवस्थापन कामाचे अनुभव प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
८. कंत्राटदारास निविदा स्विकृत झाल्याचे पत्र प्राप्त झाल्यापासुन ७ दिवसाचे आत कारारनामा करुन दयावा लागेल.अन्यथा निविदा अस्विकृत करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहिल.
९. कामगारांची ई.पी.एफ. नोंदणी करुन भरण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदार यांची रांहील.
१०. ई.पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहील.
११. ई.पी.एफ.चलान दरमाह भरणा केल्यावर देयक प्रदान करण्यात येईल.
१२. निविदा मधुन नगर परिषद पदाधिकारी यांचे सहभाग नसल्याचे रु. १००/- चे मुंद्रकांवर प्रतिज्ञापत्र जोडणे बंधनकारक राहील.
१३. देयक शोधन बिलातुन सर्व शासकीय कराची नियमानुसार कपात करण्यात येईल.
१४. मंजुर निविदा धारंकास आदेशाप्रमाणे आवश्यक त्या किंमतीच्या मुद्रांकावर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.
१५. साफ सफाई विषयी नागरीकांच्या काही तक्रारी झाल्यास २४ तासाच्या आत तक्रारीचे निवारण करावे लागेल. असे न केल्यास ५०० रु. दंड आकारण्यात येईल.

१६. वार्ड क्र. १ ते २१ मधील संपुर्ण नाल्या गटा-यांची पुर्ण साफ सफाई करणे.तसेच मोठया नाल्याची वर्षातुन एकदा साफ सफाई करणे बंधनकारक राहील.

१७. कंत्राटदाराला न.प.मालकीच्या घंटागाडयाची दुरुस्ती करावी लागेल तसेच आपला करारनामा संपल्यानंतर घंटागाडी दुरुस्ती करुन न.प.मध्ये जमा करावे लागेल असे न केल्यास अखेरचे देय प्रदान केले जाणार नाही.

१८. कंत्राटदार किवा त्याचा प्रतिनिधी सकाळी हजेरीवर हजेरी रजिस्टर सह दररोज नगर परिषद मध्ये हजर राहणे आवश्यक आहे. अन्यथा त्या दिवसी ५००/- दंड आकारण्यात येईल व ते त्याच्या महिन्याच्या देयकातुन कपात करण्यात येईल.

१९. कंत्राटदाराने आपले मजुर न.प.मध्ये ६.४५ ला न चुकता हजर करावे लागेल तसेच नेमुण दिलेल्या कामावर सकाळी ७ वाजेपासुन दुपारी २ पर्यंत काम करावे लागेल.

२०. घंटागाडी वरील मजुरांनी प्रभागातील ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करणे अनिवार्य राहिल व याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार यांची राहिल

२१. घंटागाडी वरील मजुराला नेमुण दिलेला प्रभाग पुर्णपणे ओला व सुका कचरा गोळा करणे बंधनकारक राहिल प्रभागाची तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारीचे निवारण करणे हे कंत्राटदाराची जबाबदारी राहिल तसे न केल्यास प्रति दिवस २००/-रु. दंड आकारण्यात येईल.

२२. घंटागाडी मजुर व नाली सफाई वरील मजुर यांना न.प.सदस्यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र दरमहा देयकासोबत सादर करावे लागेल.

२३. नाली सफाई कंत्राटदारांला दररोज १५ मजुर उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील व नालीतील पुर्णपणे गाळ व मलमा काढावा लागेल तसेच प्रभागाची कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक राहिल तसे न केल्यास २००/- प्रति दिवस दंड आकारुण दंडाची रक्कम महिण्याच्या देयकातुन कपात केली जाईल.

२४. कंत्राटदार यांची आपले देयके नामनिर्दीश पत्र ( letterhead ) वर सही शिक्का सह सादर करावे लागेल.

२५. कंत्राटदार यांनी मजुरांना किमान वेतन कायदयानुसार वेतनदेणे बंधनकारक राहील.

२६. नाली सफाई करणे तसेच केलेल्या नाली सफाईचा गाळ व मलमा त्वरीत उचलुन न्यावा लागेल व वार्ड क्र. १ ते २१ मधिल साफसफाई महिण्यावारी करणे बंधनकारक राहील.

२७. कंत्राटदाराने न.प.वाहनावर पुरविलेले वाहनचालक जडवाहन परवाना धारक असावे तसेच त्याचे संपुर्ण कागदपत्रे न.प.आ.वि. जमा करणे बंधनकारक राहील.

२८. कामगार विषयक नियमानुसार आवश्यक बाबीची पुर्तता करणे कंत्राटदाराची जबाबदारी असेल विमा काढणे, गणवेश देण, आदेशपत्र देणे, हात मोजे, गमबुट देणे व इतर आवश्यक सुरक्षा साहित्य व औषधी पुरविणे.

२९. कंत्राटदाराने ठेवण्यात आलेले कर्मचारी /कामगार हे कंत्राटदाराचे राहतील व त्याचा नगर परिषद मोर्शी शी कोणतीही संबध असणार नाही व त्यच्या वर्तणुकीकरीता कंत्राटदार स्वत: जबाबदार राहील.

३०. कामगार अनुषंगाने सर्व रजिस्टर कंत्राटदाराने ठेवणे बंधनकारक राहील तसेच कामावर बालकामगार ठेवता येणार नाही.

३१. संबधित काम करतांना कामावरील कामगारांना किंवा इतर कोणतेही नुकसान झाल्यास किंवा जिवीतहाणी वित्तीय हाणी झाल्यास त्यासाठी नगर परिषद मोर्शी जबाबदार राहणार नाही यास कंत्राटदार स्वत: जबाबदार राहील.

३२. कामाबाबत सविस्तर माहिती नगर परिषद आरोग्य विभाग यांना कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस सोडून द्यावी.

३३. नाली सफाई करताना नाली भवतालील काटेरी झाडे झुडपे कापुन नाली सफाई करावी लागेल.

३४. घंटागाडीव्दारे ओला व सुका कचरा वेगवेगळा न.प.बंदिस्त वाहनामध्ये जमा करुन घनकचरा प्रकल्प कोपरा येथे जमा करणे हे कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

३५. सदर कामाची अंदाजित किंमत ही प्रशासकीय मान्यतेनुसार १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ या कालावधि करीता दर्शविलेली आहे.

३६. निविदा सादर करताना काही अडचणी उद्भवल्यास आरोग्य विभागाशी सपर्क करावा.

३७. निविदा यासोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाचे वाचन करुनच भरणा करण्यात यावी.

३८. कंत्राटदाराचे देयकातुन नियमाप्रमाणे शासकीय कपाती करण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| सौ.शिलाताई अ. रोडे | श्री. जितेन्द्र प्र. गेडाम | श्री.नितीन भि.पन्नासे | पि.डी.राठोड |
| अध्यक्षा | उपाध्यक्ष | आरोग्य सभापती | मुख्याधिकारी |
| नगर परिषद मोर्शी | नगर परिषद मोर्शी | नगर परिषद मोर्शी | नगर परिषद मोर्शी |